म. ग्रं. सं. ठाणे

विषय

ग्रहालय क्रमांक

लेखक

सन

पुस्तकाचें नांव

# महास्वामिभक्त व पितृभक्त
# बहिरोबा.

('करमणूक' पत्रांत प्रसिद्ध झालेली
ऐतिहासिक गोष्ट.)

दत्तात्रय बळवंत पारसनीस,

यांनीं लिहिली.

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत छापिली.

सन १८९६ इसवी.

॥ श्री ॥

श्रीमंत महाराजाधिराज राजराजेश्वर सवाई

# श्री शिवाजीराव होळकर

जी. सी. एस्. आय्.

यांस

( स्वामिभक्तिपरायणतेबद्दल ज्ञातीची कीर्ति कायम राख-
ण्याविषयीं आपल्या ज्ञातिबांधवांस विनंति करून )

ही आवृत्ति

नम्रपणें अर्पण केली आहे.

बाळकृष्ण आत्माराम गुप्ते,

साष्टीकर.

## महास्वामिभक्त व पितृभक्त

# बहिरोबा.

छत्रपति शिवाजीमहाराज ह्यांनीं महत्प्रयासानें संस्थापित केलेल्या हिंदुपदपादशाहीच्या सिंहासनावर संभाजी महाराज आरूढ झाल्यापासून दिल्लीपति औरंगजेबास दक्षिणेंत धुमाकूळ उडवून पुनः मुसलमानी सत्तेची प्रस्थापना करण्यास उत्तम संधि मिळाली. मराठी राज्याचा अभिमान बाळगणारे चतुर मुत्सद्दी व रणशूर सरदार संभाजीच्या अनन्वित कृत्यांमुळें अगदीं त्रासून गेले व कित्येकांनीं इहलोकाचा त्यागही केला. महाराष्ट्रभूपति विलासरंगांत दंग झाल्यामुळें मुसलमान लोकांनीं हिंदुधर्माचा उच्छेद करून मरा-

त्यांचें राज्यवैभव हरण करण्यास हळूहळू सुरुवात केली. शिवछत्रपतीच्या कारकीर्दींत जेथें जेथें यवनसत्तेचा अगदीं विध्वंस झाला होता तेथें तेथें छेदून टाकलेल्या कांटेरी झाडाप्रमाणें तिचे जोमदार अंकुर दिसूं लागले. शिवदिनकराच्या दिव्य प्रतापतेजानें दिपून गेलेला व त्याची कृपा संपादण्याकरितां गोड गोड शब्दांनीं स्तुति करणारा कावेबाज औरंगजेब आतां निर्धास्तपणें दक्षिणेमध्यें संचार करूं लागला. अमीरउलउमराव, याकुदखान, असदखान, तकरीबखान, एखलासखान वगैरे सरदार आपल्या प्रचंड सैन्यानिशीं मराठ्यांवर स्वाऱ्या करून त्यांच्या ताब्यांतील मुख्य मुख्य ठाणीं सर करून घेऊं लागले. एवढेंच नव्हे; पण त्यांनीं सद्गुणछत्रास मुकलेल्या छत्रपति संभाजीराजास कैद करून त्यास यवनी धर्माची दीक्षा देण्याचा पण केला! किती

झालें तरी तो क्षत्रियकुलावतंस शिवछत्रपतीचा छावा ! तो त्यांना थोडाच वळणार ? त्यानें तुळापुरीं आपला प्राण समर्पण केला, पण प्राणाहून प्रिय हिंदुधर्म सोडला नाहीं ! !

संभाजीराजाचा वध झाल्यानंतर महाराष्ट्रावर जें संकट ओढवलें, तें शब्दांनीं वर्णन करणें अशक्य आहे. महासागर प्रक्षुब्ध झाला व त्याच्या प्रचंड लाटा आकाशापर्यंत उसळूं लागल्या म्हणजे त्यांत सांपडलेल्या जहाजाची जशी स्थिति होते, तशीच स्थिति ह्या वेळीं महाराष्ट्रराज्यनौकेची झाली होती. अपार धैर्यानें, अद्वितीय दृढनिश्चयानें व अप्रतिम चातुर्यानें आलेल्या प्रसंगांतून ह्या राज्यनौकेची सुटका करून तिला पैलतीरीं नेण्यास योग्य नाविक ह्या वेळीं मिळाले नसते तर खचित ‘ हिंदु ’ हा शब्द त्या राज्यनौकेबरोबर पार बुडाला असता ! ! मराठ्यांच्या अंगीं संघशक्तीचा

जोर कसा विलक्षण असतो; स्वराज्यसंरक्षणाकरितां ते आपल्या प्राणांच्या आहुती कशा अर्पण करितात; स्वामिकार्यपरायणता हें त्यांना जीवितसार्थक्य कसें वाटतें ह्याचें जर उत्तम उदाहरण इतिहासांत कोठें दृष्टीस पडत असेल तर तें संभाजीच्या मृत्यूनंतर झालेल्या महत्त्वाच्या राजकीय उलाढालीमध्यें निदर्शनास येतें. सर्व मराठी राज्यांत मोंगलांनीं नाकेबंदी करून प्रबल किल्ले हस्तगत करण्याचा एकसारखा क्रम चालविला, तरी आपला धैर्यगिरी कोसळूं न देतां रायगडावरील राजमहालामध्यें येसूबाईसारख्या पडदानशीन अबलेस अध्यक्षस्थानीं विराजित करून तिच्या संमतीनें सर्व राज्यकारणें विचारांत यावींत व हिंदुपदपादशाहीच्या गादीवर राजारामाची संस्थापना होऊन जनार्दनपंत हणमंते, प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत बावडेकर, खंडो

बल्लाळ चिटणीस, महादाजीनाईक पानसंबळ, संताजी घोरपडे, धनाजी जाधव आणि खंडेराव दाभाडे ह्यांचें एक मन्त्रिमंडळ तयार होऊन त्यांनीं मोंगलांच्या दाढेंतून आपली स्वराज्यसत्ता मुक्त करण्याचा प्रयत्न करावा ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. ह्या देशोद्धारक वीरमंडळानें त्या वेळीं स्वामिकार्यसिद्ध्यर्थ ज्या अलौकिक कृति केल्या त्या वाचून मन अगदीं आश्चर्यचकित होऊन जातें; व असे स्वार्थनिरपेक्ष, बाणेदार, दृढनिश्चयी पुरुष अवतीर्ण झाल्यावांचून राष्ट्रास उन्नतावस्था कधींही प्राप्त व्हावयाची नाहीं अशी खात्री वाटूं लागते.

मोंगलांनीं मराठ्यांच्या ताब्यांतील विशाळगड, रायगड वगैरे किल्ले हस्तगत करून राजारामास व त्याच्या साहाय्यकारी प्रधानमंडळास हस्तगत करून घेण्याचा यत्न चाल-

विला. याकुदखानानें रायगडावर हल्ला केला. परंतु जवानमर्द मावळे लोकांपुढें त्याचा बिलकुल उपाय चालेना! तेव्हां त्यानें सूर्याजी पिसाळ नांवाच्या एका मराठे सरदारास वांईची देशमुखी देण्याची लालूच दाखवून त्यास वश केलें व त्याच्या साहाय्यानें रायगड सर केला.

मराठ्यांचा मुख्य व बळकट किल्ला मोंगलांच्या हातांत गेल्यामुळें राजारामास व त्याच्या मंत्रिमंडळास फार काळजी उत्पन्न झाली. मोंगलांचें अपार सैन्य सागराप्रमाणें चोंहींकडे पसरलें होतें. मिरज, पन्हाळा, विशाळगड वगैरे किल्ल्यांस त्यांचे मोर्चे लागले होते. अशा स्थितींत महाराष्ट्रांत राहणें सुरक्षितपणाचें नाहीं असें समजून राज्यांतील प्रमुख मंडळीनें राजारामास कर्नाटकांत पाठविण्याचा संकेत केला. रामचंद्रपंत बावडेकर

ह्यांनीं विशाळगड, रांगणा वगैरे किल्ले आपल्या जिमेखालीं घेऊन परशुराम त्रिंबक, सिदोजी गुजर, कान्होजी आंग्रे, महादाजी पानसंबळ ह्यांच्या साहाय्यानें महाराष्ट्राचें संरक्षण करून युक्तिप्रयुक्तीनें मोंगलांचा नाश करण्याचा निश्चय केला; व इकडे राजाराम, प्रल्हाद निराजी, धनाजी जाधव, संताजी घोरपडे व खंडो बल्लाळ चिटणीस इत्यादि मंडळीनें चंदीस जाऊन व तेथें मराठे सैन्य जमा करून तेथून मोंगलांचा फडशा पाडण्याचा विचार केला. ही गोष्ट औरंगजेब बादशहास समजली, तेव्हां त्यानें विजापूर-कर्नाटक प्रांताचा फौजदार कासीमखान यास सक्त ताकीद करून व त्याच्याकडून ठिकठिकाणच्या ठाणेदारांस वर्दी पाठवून ह्या मंडळीस पकडावें अशी योजना केली. जागोंजाग मोंगलांचे घोडेस्वार व शिपाई मोठ्या बारकाईनें राजा-

रामाचा शोध करीत त्याच्या पाळतीवर हिंडूं लागले. हें पाहून ह्या मराठे मंडळींनीं रामेश्वराच्या यात्रेस जाणाऱ्या लिंगाईत जंगमांचीं सोंगें घेतलीं व अनंत संकटें सोसून ते मोंगलांच्या तावडींतून सुटून चंदीस जाऊन दाखल झाले. चंदीस गेल्यानंतर राजारामास राज्याभिषेक होऊन तेथें मराठी राज्याची गादी संस्थापित करण्यांत आली आणि मोंगलांचें पारिपत्य करण्याचा निश्चय झाला. प्रल्हाद निराजी व खंडो बल्लाळ ह्यांचीं रामचंद्रपंतांबरोबर राजकारणें सुरू होऊन, मुसलमान सरदार झुल्फिकारखान ह्याचा मोड करून त्यास दक्षिणेंतून हांकून लावण्याचा विचार ठरला. त्या वेळीं खंडो बल्लाळ चिटणीस ह्यांनीं स्वतः ही कामगिरी स्वीकारिली. रामचंद्रपंत व त्यांचे जोडीदार परशुराम त्रिंबक आणि नारो शंकर सचिव

ह्यांच्याकडे गुप्त रीतीनें पत्रें पाठवून त्यांचें सैन्य चंदीच्या रोखें एकत्र जमवावें व मोक्याच्या जागा शोधून काढून मुसलमान सैन्यास अचूक शह द्यावा असा खंडो बल्लाळ ह्यांनीं बेत ठरविला; व त्याप्रमाणें त्यांनीं एकट्यांनीं जाऊन सर्व योजना उत्तम प्रकारें जुळविली. तेथून परत चंदीस येत असतां त्या स्वामिनिष्ठ पुरुषाचा त्रिवेदी अरुणाचल येथें मुक्काम पडला. मोंगल लोक मराठ्यांच्या अगदीं पाळतीवर असल्यामुळें आकस्मिक खंडो बल्लाळ यांची बातमी त्यांस समजली. कोंडोजी विठ्ठल नांवाच्या एका कृतघ्न ब्राह्मणास त्यांनीं वश करून त्याच्या साहाय्यानें खंडो बल्लाळ ह्यांस तेथल्या तेथें कैद केलें.

मोंगलांनीं कैद केल्यानंतर खंडो बल्लाळ ह्यांस अतिशय दुःख झालें, व सैन्याची सर्व व्यवस्था उत्तम झाली असल्यामुळें चंदीस

जाऊन लगेच मुसलमानांशीं युद्ध करावयाचें असा जो बेत होता, तो आतां कसा सिद्धीस जाईल ही काळजी त्यांस फार त्रास देऊं लागली. मनुष्यानें एकादें लहानसें कार्य मोठ्या उत्साहानें करण्याचा निश्चय केला व मध्यंतरीं संकट ओढवलें तर त्याचा किती हिरमोड होतो ! मग हें तर स्वामिकार्य ! ह्यापासून सर्व महाराष्ट्राचें कल्याण व्हावयाचें. त्यास ऐनप्रसंगीं असा अडथळा प्राप्त झाला हें पाहून खंडो बल्लाळासारख्या खऱ्या देशभक्ताच्या मनाची काय स्थिति झाली असेल ह्याची कल्पना वाचकांनींच करावी !

राजारामाच्या मंत्रिमंडळांतील खंडो बल्लाळासारखा प्रमुख पुरुष हातीं लागल्यामुळें मुसलमान सुभेदार तारबियतखान ह्यास परमानंद झाला व त्यानें त्याच्या पायामध्यें दीड मणाची खंबीर बेडी अडकवून व तोफेचा

साखळदंड गळयास बांधून त्यास अरुणाच-लाच्या किल्ल्यामध्यें पक्क्या बंदोबस्तानें कैदेंत ठेविलें. अशी दुर्धर स्थिति प्राप्त झाली तरी खंडो बल्लाळांनीं आपलें धैर्य न सोडतां तिच्यां-तून मुक्त होण्याचा प्रयत्न चालविला. खंडो बल्लाळ ह्यांस मुसलमानांच्या बंदीखान्यांतील दुःखांचा ताप जितका असह्य होत होता, त्याच्यापेक्षां शतपटीनें जास्त, योजिलेली मस-लत सिद्धीस जाण्यास विलंब लागत चालला त्याचें दुःख असह्य वाटत होतें. ह्मणून त्यांनीं हरप्रयत्नानें कारागृहांतून मुक्त होण्याचा बेत चालविला.

अरुणाचलाच्या किल्ल्यावर जो पहारेकरी होता तो हिंदु असल्यामुळें त्यास खंडो बल्ला-ळ ह्यांनीं वश करण्याचा घाट घातला. खंडो बल्लाळ यांची वाणी जात्याच मोहक अस-ल्यामुळें त्यांनीं त्या पहारेकऱ्याची विनवणी

करितांच त्यास त्यांची दया आली व त्यानें त्यांस आपल्या सदृश चेहऱ्याचा एक मनुष्य बदली देऊन तुरुंगाच्या बुरुजावरून उडी टाकून जाण्याची मोकळीक दिली. परंतु सदृश चेहऱ्याचा मनुष्य कोण सांपडतो ही पंचाईत उत्पन्न झाली. तेव्हां खंडो बल्लाळ ह्यांनीं पूर्ण विचार करून आपला वडील पुत्र बहिरोबा ह्यास आपल्या सन्निध आणविलें. पितृभक्तिपरायण बहिरोबा गुप्त रीतीनें आपल्या वडिलांजवळ येऊन दाखल झाला. त्याची मूर्ति पाहतांच खंडो बल्लाळ ह्यांचें अंतःकरण आनंदानें सद्गदित झालें. त्याचप्रमाणें बहिरोबासही आपल्या वडिलांची ती दीन झालेली मूर्ति पाहून अतिशय द्रव आला. ह्या वेळीं त्या पितापुत्रांच्या मनाची जी स्थिति झाली असेल ती शब्दांनीं काय वर्णन करावी ? खंडो बल्लाळ ह्यांनीं मोठ्या वात्सल्यानें

आपल्या चिरंजिवास पोटाशीं धरिलें, व त्यास सविस्तर वृत्त निवेदन करून असें सांगितलें कीं, " तूं माझा पुत्र आहेस. स्वामिकार्यार्थ मरण्याकरितांच हा जन्म आपण घेतला आहे. यावेळीं तूं मला साहाय्य करशील, तर सर्व महाराष्ट्रावर फार उपकार होतील. दुष्ट यवनांच्या ताब्यांतून आपलें राज्य परत घेण्याचा माझा विचार आहे. सैन्याची सर्व तयारी झाली आहे. महाराजांकडे चंदीस जाऊन तेथून सैन्य पाठविण्याचाच काय तो अवकाश आहे. दुर्दैवानें मी शत्रूच्या हातांत सांपडलों आहें. माझ्याऐवजीं तूं हा बंदिवास पतकरशील तर माझी सुटका होऊन मला पुढील मसलत सिद्धीस नेतां येईल. ह्याकरितां तुजजवळ माझी अशी प्रार्थना आहे कीं, तूं माझी इच्छा पूर्ण कर व मला स्वामिकार्य सिद्धीस नेण्याची संधि दे." हे वडिलांचे शब्द

ऐकतांच त्या पितृभक्त बहिरोबानें त्यांस मोठ्या संतोषानें आपलें अनुमोदन दर्शविलें; एवढेंच नव्हे तर जमादाराकडून आपल्या वडिलांच्या पायांतील लोहशृंखला आपल्या पायांत घालून घेतली, तोफेचा साखळदंड आपल्या गळ्यांत अडकवून घेतला, आणि आपल्या वडिलांकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पाहून त्यांस असें सुचविलें कीं, "तुह्मीं आतां लवकर जा आणि स्वामिकार्य सिद्धीस नेऊन महाराष्ट्रभूस मोंगलांच्या पारतंत्र्यांतून मुक्त करा." हा सगळा प्रकार चालला असतां खंडो बल्लाळ ह्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा एकसारख्या चालल्या होत्या. त्यांच्या मुखावाटें एक शब्दही निघेना! पुत्राची निस्सीम भक्ति पाहून त्यांचा कंठ अगदीं भरून आला, व अखेर त्यांनीं त्यास एक वेळ दृढालिंगन देऊन त्याचा प्रेमपूर्वक निरोप घेतला. ह्या वेळचा देखावा वर्णन करण्यास

कोण समर्थ आहे ? वामन पंडितांनीं सुपुत्राचें वर्णन करितांना ह्मटलें आहे :-

" जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच. "

हें वर्णन बहिरोजीस किती अन्वर्थक आहे बरें ?

असो; स्वामिकार्याकरितां आपल्या प्रिय पुत्रास बळी देणारे लोकोत्तर सेवक खंडो बल्लाळ, त्या अरुणाचलांतून तुरुंगाच्या बुरुजावरून उडी टाकून पुढें चंदीस गेले व तेथून त्यांनीं आपलें इष्टकार्य सिद्धीस नेलें, हें निराळें सांगण्याची आवश्यकताच नाहीं. असा स्वार्थत्याग करणारे अलौकिक पुरुष महाराष्ट्रांत त्या वेळीं होते, ह्मणून त्यांनीं पुनः सर्व महाराष्ट्रदेश मोंगलांपासून जिंकून घेऊन मराठी साम्राज्याची गादी सातारा येथें संस्थापित केली. खरोखर असल्या पराक्रमी नररत्नांचा कोणास अभिमान वाटणार नाहीं ?

खंडो बल्लाळ यांचा छत्रपति राजारा[m]
ह्यांनीं पुढें अतिशय गौरव केला, परंतु त्यां[च्या]
पुत्र बहिरोबा ह्यास, अरुणाचल येथील मोंग[ल]
सरदारानें मुसलमानी धर्माची दीक्षा दिली [व]
त्याचा मोठ्या क्रूरत्वानें वध केला. आपल्या
पोटचा प्रियकर पुत्र समर्पण करून राजका-
रण साधल्याचें हें उत्तम उदाहरण कोरडा
देशाभिमान बाळगणारांनीं विशेष लक्ष्यांत
ठेवण्यासारखें आहे.